IMPACT FACTOR 5.473(SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL

Interdisciplinary Peer-Reviewed IndexedJournal

ISSN 2455-4375

# भंडारा जिल्ह्यातील दुग्धव्यवसाय, पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय सेवा

**डॉ. एस.एच. भैरम**

जगत महाविद्यालय गोरेगांव

जि. गोंदिया

**प्रस्तावना :—**

सन २००१ च्या पशुगणनेनुसार भंडारा जिल्ह्यात ६ लाख १३ हजार ८८० पशुधन होते. या पशुधनापैकी गाई, म्हशी ५२% म्हशी व रेडे १५%, शेळ्या, मेंढ्या २९%, घोडे, सिंगरे व इतर पशुधन ४% होते. याशिवाय कुकुट वर्गीय पक्ष्यांची संख्या ४ लाख ५० हजार ५१० होती. जिल्ह्यात मान्यताप्राप्त ३ पशुवध गृहांची संख्या असून त्यामध्ये सन २०००—०१ या वर्षी ३ हजार २१२ शेळ्या मेंढ्यांची कत्तल केल्याचे आढळते. मागील वर्षीच्या तुलनेत मासांच्या कत्तलीचे प्रमाणात १९.२७% घट झालेली आहे. जिल्ह्यात ३१ मार्च २००१ मध्ये १ पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय १८ दवाखाने, २४ मदत केंद्रे, १ फिरते पशुरोग नियंत्रण पथक, ८२ कृत्रिम रेतन केंद्र, १ दक्षता पथक, २ फिरते दवाखाने, १ पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा इत्यादी केंद्रे आहेत. या सुविधामार्फत जिल्ह्यातील १८ हजार ७१२ जनावरांवर कृत्रिम गर्भधारणा, ९ हजार १३२ जनावरांचे खच्चीकरण करण्यात आले तर ९५ हजार ५८६ जनावरांवर औषधोपचार करण्यात आले. जन्मलेल्या एकूण ७ हजार ७२६ वासरांच्या संख्येपैकी ५ हजार ६०९ संकरित वासरे होती. २०००—०१मध्ये ३ लाख ६८ हजार ६९१ जनावरांना लस टोचण्यात आली.

शेतीसाठी पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय करण्यात येतो. जिल्ह्यात ३१५ पंजीबद्ध सहकारी दुग्ध संस्था असून भंडारा २, पवनी १, तुमसर १ अशी ४ शीतगृहे आहेत. २०००—०१ मध्ये दैनिक सरासरी दूध संकलन ४४ हजार लिटर होते. शीतगृहांची एकूण क्षमता ८० हजार लिटर आहे. सरकारी दुग्ध संकलन केंद्रामार्फत शासकीय दूध योजनेअंतर्गत दूध संकलन व वितरण केले जाते. जिल्ह्यात गायी व म्हशींची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.

गोंदिया जिल्ह्यात पशुगणनेनुसार ७ लाख ५१ हजार ६२८ पशुधन होते. या पशुधनांपैकी घोडे, सिंगरे व इतर पशुधन ४%, शेळ्या व मेंढ्या २५% म्हशी व रेडे १३%, गायी—बैल ५७% होते. कुक्कुट वर्गीय पक्ष्यांची संख्या ४ लाख ७२ हजार ४८३ होती. शेतमजूर हे कुक्कुटपालन हा जोडधंदा करीत असल्यामुळे कुक्कुटांच्या संख्येतही ४.४४% इतकी वाढ झालेली आहे. जिल्ह्यात दोन पशुवधगृह यांची संख्या असून २०००—०१ या वर्षी शेळ्या—मेंढ्यांची कत्तल केल्याचे दिसून येते. ३१ मार्च २००१ रोजी जिल्ह्यात ९१ कृत्रिम रेतन केंद्रे, १ दक्षता पथक, १ फिरता दवाखाना, २९ मदत केंद्रे, २६ दवाखाने आहेत. या सुविधेद्वारे ११ हजार ९३७ जनावरांवर कृत्रिम गर्भधारणा, १२ हजार ५४१ जनावरांचे खच्चीकरण व ७१ हजार ३५५ जनावरांवर औषधोपचार करण्यात आले. जन्मलेल्या ४ हजार ०७२ वासरांच्या संख्येपैकी २ हजार ४९६ संकरित वासरे होती. या वर्षात कृत्रिम रेतन जनावरांची शस्त्रक्रिया, लसीकरण, जनावरांवर औषधोपचार, शेतकऱ्यांची शिबिरे व प्रशिक्षण इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. जिल्ह्यात सधन पशुधन विकास प्रकल्प असून त्यामार्फत जनावरांच्या नवीन सुधारित जातीची पैदास व कृत्रिम गर्भधारणा वगैरे कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार केला जातो. जिल्ह्यात २३४ पंजीबद्ध सहकारी दुग्ध संस्था असून सडक अर्जुनी

१, सालेकसा १ व गोंदिया १ असे एकूण ३ शीतगृहे आहेत. शीतगृहांची एकूण क्षमता ३५ हजार लिटर असून २०००—०१ मध्ये दैनंदिन सरासरी दूध संकलन ४६ हजार लिटर होते.

**मत्स्योत्पादन :—**

भंडारा जिल्ह्याला तलावांचा जिल्हा म्हणून संबोधण्यात येते. मार्च २००१ च्या अखेरपर्यंत ११ हजार ७६५ हेक्टर क्षेत्र मत्स्य उत्पादनासाठी अनुकूल आहे. या अनुकूल क्षेत्राच्या ८४% क्षेत्र प्रत्यक्ष वापरात आणण्यात आले आहे. मत्स्योत्पादनाच्या लिलाव पद्धतीने विक्री केल्या जाते. सन २०००—०१ वर्षात १० हजार ७७० मेट्रिक टन माशांचे उत्पादन झाले व त्यापासून १६.१५ कोटी रुपये उत्पन्न मिळाले. जिल्ह्यात मोहाडी तालुक्यात नागठाणा, साकोली तालुक्यात सिवनीबांध या ठिकाणी मत्स्यबीज केंद्रे कार्यरत आहेत. सन २०००—०१ मध्ये मत्स्यबीज केंद्रात ३१८.५० लाख मत्स्यबीज सोडण्यात आलेले आहेत.

गोंदिया जिल्ह्याला तलावाचा जिल्हा संबोधण्यात येतो कारण जिल्ह्यात नदीची लांबी ४२० किलोमीटर आहे. मार्च २००१ अखेर नद्या, तलाव मोठा जलाशयाचे २२ हजार ५५५ हेक्टेर क्षेत्र मत्स्योत्पादनासाठी अनुकूल आहे. या अनुकूल क्षेत्राच्या ८७% क्षेत्र प्रत्यक्ष वापरात आणण्यात आले आहे. सन २०००—०१ वर्षात २१ हजार ०६५ मेट्रिक टन माशांचे उत्पादन होऊन त्यापासून ३१.६० कोटी रुपये उत्पन्न प्राप्त झाले. मत्स्योत्पादनाच्या लिलाव पद्धतीने विक्री केली जाते. जिल्ह्यात गोंदिया तालुका आंभोरा, अर्जुनी मोरगाव तालुक्यात इटियाडोह या ठिकाणी मत्स्यबीज केंद्रे कार्यरत आहेत. सन २०००—०१ मध्ये मत्स्यबीज केंद्रात ८४९.५३ लाख मत्स्यबीज सोडण्यात आलेले आहे.

**उद्योग व खनिजे :—**

भंडारा जिल्ह्यात २०००—०१ वर्षात लाखांदूर, साकोली, भंडारा तालुक्यात कायनाईट, सिलीमीनाईट, पायरोफिलाईटचे ३ हजार ११७ मेट्रिक टन उत्पादन झाले. भंडारा तालुक्यात कोरंडम ६ मेट्रिक टन, क्रोमोनाईट पवनी तालुक्यात २६ मेट्रिक टन सॅंड, मोहाडी तालुक्यात ४ हजार ३२० मेट्रिक टन तसेच गोंदिया जिल्ह्यात गोंदिया तालुक्यात क्वार्टर्स ७२४ मेट्रिक टन उत्पादन झालेत. याशिवाय रेती ९ लाख, इमारती दगड / बोल्डर १४.५० लाख मेट्रिक टन तसेच कवले विटांची माती ९० हजार मेट्रिक टनाचे उत्पादन झाले.

भंडारा व गोंदिया जिल्हा खालील उत्पादनाच्या बाबतीत समृद्ध आहे हलक्या व उच्चप्रतीचे मॅगनीज जिल्ह्यात आढळते. तसेच खनिजांमध्ये क्वार्टर्स, पायरोफिलाईट, कोरंडम, सिलीमीनाईट, कोलाईट, लोह खनिज, सॅंडखनिजे आढळतात. गौण खनिजात रेती, इमारती दगड, बोल्डर, विटा व कवले तयार करण्यासाठी लागणारी माती इत्यादी प्रकारचे खनिजे आढळतात. कच्च्या मागणीचा साठा तुमसर तालुक्यात बालापुर (हमेशा) डोंगरी बु. इंदर बुची, सिता सावंगी, चिखला येथे आढळतो. २०००—०१ वर्षात एकूण २लाख ४२ हजार ००१ मेट्रिक टन कच्च्या मॅगनीजचे उत्पादन झाले.

भंडारा व गोंदिया जिल्ह्यात सन २०१४ अखेर नोंदणीकृत कारखान्यांची संख्या ७१९ इतकी होती. पैकी ६६९ कारखाने चालू स्थितीत आहे. त्यात काम करणाऱ्या कामगारांची संख्या ७ हजार ७७५ इतकी आहे. जिल्ह्यात अनेक छोटे—मोठे कारखाने आहेत. भंडारा शहरात पितळी भांडी तयार करण्याचे अंदाजे ८० कारखाने आहेत. सन १९४५ पासून भंडारा शहरात पितळी भांड्यचा व्यवसाय सुरू असून तो स्वातंत्र्योत्तर काळात वृद्धिंगत होत गेला. मात्र आज पितळी भांड्यांच्या स्पर्धेत अन्य धातू आल्यामुळे या उद्योगाचे भवितव्य अंधकारमय झाले आहे. तरीसुद्धा आजही दररोज अंदाजे १५ ते २५ टन पितळी भांड्याची मोड

भंडारा शहरात विक्रीस येते. जिल्ह्यात दुसरा महत्त्वाचा उद्योग बिडी तयार करणे हा आहे. या उद्योगाचे भंडारा जिल्ह्यात साकोली, तुमसर, मोहाडी व भंडारा तर गोंदिया जिल्ह्यात गोंदिया, गोरेगाव, तिरोडा व आमगाव तालुक्यात जवळपास १२० कारखाने कार्यरत आहेत व या कारखान्यात २९ हजार ०२३ कामगारांना रोजगार उपलब्ध होत आहे.

जिल्ह्यामध्ये उद्योगाच्या विकासासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे भंडारा जिल्ह्यात महाराष्ट्र भंडारा शहरापासून १६ किमी अंतरावर मौजा राजेगाव व गडेगाव येथे साकोली महामार्गावर १४२.७१ हेक्टर जमिनीवर औद्योगिक वसाहत निर्माण करण्यात आली आहे. या वसाहतीत एकूण ४२ भूखंड आहेत, त्यापैकी ३७ भूखंड वेगवेगळे उद्योग स्थापण्यासाठी देण्यात आलेले आहे. तसेच गोंदिया शहरात गोंदियापासून ६ किमी अंतरावर मौजा मुंडीपार येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत १४६.१४ हेक्टर जमीन संपादित करून विकास केलेला आहे. या जमिनीअंतर्गत १४० भूखंडाची स्थापना करण्यात आली, त्यापैकी ६१ भूखंड वेगवेगळ्या उद्योगांच्या स्थापनेसाठी वितरित करण्यात आलेले आले आहेत. या दोन्ही वसाहतींमध्ये विजेची व पाण्याची सोय महामंडळाद्वारे करण्यात येते. भंडारा जिल्ह्यात एक सहकारी उद्योग समूह ८.२४ हेक्टर जमिनीवर उभारण्यात आला आहे. त्यात ९० सभासद आहेत व उद्योगांची संख्या ४८ आहे. एकूण विकसित भूखंडांची संख्या ७१ असून त्यापैकी ७० भूखंडांचे वितरण करण्यात आले आहे व शिल्लक एक भूखंड संस्थेचे कार्यालय याकरिता सुरक्षित ठेवलेले आहे. या उद्योगांमध्ये ४०३ कामगार कार्यरत आहेत.

भंडारा औद्योगिक वसाहतीत अशोक लेलँड कंपनीचा प्रमुख उद्योग आहे. या उद्योगाचे १२ पूरक उद्योग कार्यरत आहेत, या उद्योगांपैकी केवळ ६ उद्योग सुरू असून त्या उद्योगांतर्फे अशोक लेलँड कंपनीला उत्पादित माल पुरविला जातो. हिंदुस्तान कंपोझिट इंडिया लिमिटेड हा उद्योग गडेगाव येथे २० हजार ५०० चौ.किमी. क्षेत्रात उभारला असून या उद्योगाकडून जाईंटस, क्लज व ब्रेकलाईनिंगचे उत्पादन केले जाते आणि त्याची निर्यात सुद्धा केली जाते. भंडारा रोड रेल्वे स्टेशनच्या बाजूला एकलारी गावाजवळ मेसर्स सनफ्लॅग आयर्न स्टील कंपनी, दिल्ली यांचा पोलाद कारखाना उभारण्यात आलेला आहे. त्यासाठी जवळपास १७० हेक्टर जमीन मौजा बिडसितेपार, शिरसी, वरठी व एकलारिया गावाद्वारे उपलब्ध करून देण्यात आले आहे. १६० हजार मेट्रिक टन सेलेबल स्टील व १५० हजार मेट्रिक टन स्पंज लोखंडाची वार्षिक उत्पादन क्षमता या कारखान्याची आहे.या कारखान्यात कुशल व अकुशल ६०० कामगार कार्यरत आहेत.

**कामगार व उद्योग विनीमय :—**

भंडारा व गोंदिया जिल्हा मिळून भंडारा येथे विनिमय केंद्र आहे. या केंद्राअंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगार युवकांना नोंदणी करणे सोयीचे व्हावे म्हणून जिल्हा सेवायोजन कार्यालयातर्फे महिन्यातून एकदा तालुकास्तरावर पथक पाठविण्यात येते. गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथे आदिवासी भागातील बेरोजगार सुशिक्षित युवक—युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या करिता मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. ३१ मार्च २००१ पर्यंत रोजगार विनिमय केंद्रात १लाख ५० हजार १७३ बेकार व्यक्तींची नोंदणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी ९३ व्यक्तींना खाजगी, १७८ व्यक्तींना सार्वजनिक क्षेत्रात रोजगार प्राप्त झाला आहे. यात अनुसूचित जाती व जमातीचे २९% उमेदवार असल्याचे निदर्शनास आले. सन २०००—०१ मध्ये १७२ मालकांनी उद्योग विनिमय केंद्रांची मदत घेतली असून वेगवेगळ्या उद्योगातील ४४९ आस्थापनात ४६ हजार ७८२ लोकांना रोजगार उपलब्ध झाल्याचे दिसून येते. त्यापैकी शासकीय व

निमशासकीय उद्योगांना ३४ हजार ९८८ कामगार व खाजगी उद्योगांना ११ हजार ७९४ कामगार कामावर आहेत.

भंडारा व गोंदिया जिल्ह्यात २०००–०१ या वर्षात खाजगी क्षेत्रात ९३ व सार्वजनिक क्षेत्रात १७८ अशा एकूण २७१ व्यक्तींना रोजगार प्राप्त झाला. या दोन्ही क्षेत्रात क्रमश: ७.९७% व ४.१६% रोजगार या अंतर्गत उपलब्ध झाला.

भंडारा व गोंदिया जिल्ह्यात २००१ वर्षात सुतार, लोहार व चांभार या कुशल कामगारांचे प्रतिदिन मजुरीचे दर सरासरी क्रमश: ४९ रुपये, ४४ रुपये व २७ रुपये आहेत. तर शेतमजुरांचे ३० रुपये व इतर मजूर २५ रुपये, मेंढपाळ यांना २५ रुपये प्रतिदिन मजुरी देण्यात आली.

१९९८ मध्ये संचालनालयातर्फे आर्थिक गणना करण्यात आली. या आर्थिक गणनेनुसार कृषी व बिगर कृषी आस्थापनेमध्ये २ लाख २५ हजार ६०७ कामगार काम करीत होते. यापैकी ७३.६०% कामगार शहरी भागात काम करीत होते. एकूण कामगारांपैकी वेतनावर काम करणारे कामगार ८५ हजार ३०७ (३७.८१%) होते. जिल्ह्यातील प्रत्येक आस्थापनेत सरासरी दोन कामगार काम करीत होते, तर ग्रामीण व नागरी भागातील आस्थापनेकरिता हेच प्रमाण २ व ३ असे होते. भंडारा व गोंदिया जिल्हा मिळून प्रत्येक उद्योग गटात असणाऱ्या कामगारांची गटवार माहिती या प्रकाशनातील तक्ता क्रमांक ५.१२ मध्ये देण्यात आलेली आहे. एकूण आस्थापनेपैकी धातू निर्माण या उद्योग गटात सर्वाधिक म्हणजे २९ हजार १५७ (२९.७५%) आस्थापना होत्या. त्यामध्ये एकूण कामगारांपैकी ७० हजार ४६० (३१.२३%) कामगार काम करीत होते. सामाजिक व व्यक्तिगत आणि सामूहिक सेवा या उद्योग गटाचा दुसरा क्रमांक लागतो. यामध्ये एकूण १८ हजार १८३ (१८.५५%) आस्थापना होत्या. कामगार संख्येच्या दृष्टीने विचार केल्यास या आस्थापनेमध्ये ६१ हजार २८० (२७.१६%) कामगार काम करीत होते. किरकोळ व्यापार या उद्योग गटात २१ हजार ७०२(२२.१५%) अस्थापना होत्या. या स्थापनेमध्ये ३५ हजार ३२२ (१५.६६%) कामगार काम करीत होते. उर्वरित उद्योग गटातील २८ हजार ९६१ (२९.५५%) आस्थापनांमध्ये ५८ हजार ५४५ (२५.९५%) कामगार गुंतलेले होते.

भंडारा व गोंदिया जिल्ह्यात सर्व गट मिळून एकत्र या गटातील स्वयं कार्यरत उद्योगांची एकूण संख्या ८० हजार ९३० आहे. यापैकी ग्रामीण भागात ६७ हजार ६७० (८३.६२%) व शहरी भागात १३ हजार २६० (१६.३८%) उद्योग अस्तित्वात आहेत. स्वयंकार्यरत उद्योगातील व्यक्तींची, कामगारांची संख्या ४० हजार ४०० आहे. त्यापैकी ग्रामीण भागात ३७ हजार २०२ (९२.०८%) व शहरी भागात ३ हजार १९८ (७.९२%) व्यक्ती कामावर आहेत.

भंडारा व गोंदिया जिल्हा मिळून कृषी व बिगर कृषी उद्योगांची संख्या ९८ हजार ००३ असून यापैकी ८१.२३% अस्थापना ग्रामीण भागात तर केवळ १८.७७% आस्थापना शहरी भागात कार्यरत आहेत. एकूण आस्थापनेपैकी सार्वजनिक क्षेत्रात ६ हजार ८२१ (६.९६%), ८६० (०.८८%) आस्थापना सहकारी क्षेत्रात व ९० हजार ३२२ (९२.१६%) खाजगी क्षेत्रात कार्यरत आहेत. एकूण आस्थापनांच्या ८.०९% आस्थापनेचे मालक अनुसूचित जमातीचे तर २०.९९% आस्थापनेचे मालक अनुसूचित जातीचे आहेत. एकूण आस्थापनेपैकी १७.७५% आस्थापनेमध्ये उत्पादनासाठी विजेचा वापर करण्यात येत होता तर १३.८३% आस्थापना जागाविरहित कार्यान्वित होत्या.

भंडारा व गोंदिया जिल्हा मिळून बिगर कृषी सहकार क्षेत्रात असणाऱ्या एकूण ८५४ आस्थापनेपैकी १७१ आस्थापना शहरी भागात ६८३ आस्थापना ग्रामीण भागात होत्या. एकूण आस्थापनेपैकी १४.२४% आस्थापना विजेवर चालणाऱ्या होत्या.

**अधिकोष :—**

३१ मार्च २००१ रोजी शहरे व खेडी धरून भंडारा व गोंदिया जिल्ह्यात प्रत्येकी ५६ ठिकाणी बँका कार्यरत होत्या. मार्च २००१ रोजी राष्ट्रीयकृत बँक शाखा भंडारा जिल्ह्यात ६३ सहकारी बँक शाखा ५६ होत्या. त्याचप्रमाणे गोंदिया जिल्ह्यात राष्ट्रीयीकृत बँक शाखा ६७ तर सहकारी बँक शाखा ४४ असल्याचे दिसून येते. याप्रमाणे दर अधिकोष शाखा लोकसंख्येच्या तुलनेत सरासरी १० हजार ६२२ लोकसंख्येस सेवा उपलब्ध करून देते. एक लाख लोकसंख्येच्या मागे १० अधिकोष शाखा, कार्यालये असल्याचे दिसून येते.

**सहकार :—**

भंडारा व गोंदिया जिल्हा मिळून भंडारा येथे मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यालय आहे. अल्पमुदतीचे ४२.३१ कोटी रुपये, मध्यम मुदतीचे २१.७३ कोटी रुपये व दीर्घ मुदतीचे ०.५३ कोटी रुपये असे एकूण २०००—०१ या वर्षात या बँकेने ६४.५७ कोटी रुपयांचे कर्जवाटप केले. त्यापैकी येणे कर्ज १४९.४६ कोटी रुपये व थकीत कर्जाची राशी ७१.६० कोटी रुपये होती. भंडारा व गोंदिया जिल्ह्यात क्रमश: २४० व १४८ सामाजिक संस्था अस्तित्वात आहेत. त्यापैकी क्रमश: ९८ व ४६ गृहनिर्माण, ग्राहक भंडार ३० व १६, परिवहन संस्था ० व ५ व इतर संस्था ३१ २५ तर, कामगार कंत्राटदार संस्था ८१ व ५६ कार्यरत होत्या.

भंडारा जिल्ह्यात १ हजार ३४६ सहकारी संस्थेपैकी ५८२ (४३%) पतसंस्था आणि ७६४ (५७%) बिगर पतसंस्था कार्यरत होत्या. एकूण पदसंस्थांपैकी ३८३ (६५.८१%) संस्था कृषी पतपुरवठा संस्था होत्या. तर १९९ बिगर कृषी पतसंस्था असून ७६४ बिगर कृषी ना पतपुरवठा संस्था होत्या. प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांनी ७.७४ कोटी रुपये अर्थसहाय्य केले.

भंडारा व गोंदिया जिल्ह्यात २०००—०१ वर्षअखेर सर्व प्रकारच्या क्रमश: १ हजार ३४६ व ९९४ संस्था कार्यरत होत्या. त्या मधील सभासद संख्या क्रमश: ३ लाख ४९ हजार १८० व २ लाख ४६ हजार १२२ इतकी होती. गतवर्षीपेक्षा यावर्षी संस्थेच्या संख्येत १४.४८% वाढ तर सभासदांच्या संख्येत ७.३५ वाढ झालेली दिसून येते.

**बाजारभाव व किंमती :—**

प्रतिवर्ष नागपूर केंद्रासाठी ग्राहक किंमतीचा निर्देशांक जाहीर करण्यात येतो. हाच निर्देशांक भंडारा व गोंदिया जिल्ह्यासाठी वापरला जातो. सप्टेंबर १९८८ पर्यंत १९६० हे 'पायाभूत वर्ष' ग्राह्य धरण्यात आले होते. ऑक्टोंबर १९९८ पासून १९८२ हे पायाभूत वर्ष ग्राह्य धरण्यात आलेले आहे. त्या पायाभूत वर्षानुसार २०००—०१ या वर्षात जिल्ह्यातील कामगारांसाठी ग्राहक किंमतीच्या सर्वसाधारण निर्देशांक ४६९ होता आणि त्यातील उपबाबींपैकी अन्न ४३९, पानसुपारी, तंबाखू इत्यादी ७०८, इंधन दिवाबत्ती ४३७, घरे ७२५, कापड बिछाना व पादत्राणे २८९ व संकीर्ण ४८५ याप्रमाणे निर्देशित केला होता. १९९९—२००० च्या तुलनेत संदर्भ वर्षाच्या निर्देशांकात ६.८३% वाढ झालेली आहे. संदर्भ वर्षातील किंमतीची तुलना १९९८ वर्षाशी केली असता सिगारेट, सुपारी, कोलगेट, टूथपेस्ट, लक्स साबण, रॉकेल, जळाऊ लाकूड, चहापत्ती, सुखी मिरची, कोंबडीची अंडी, ताजे मासे, बोकडाचे मांस, शुद्ध तूप, सुटे दूध, वनस्पती तूप,

उडीद, बाजरी, ज्वारी, गहू व तांदूळ या वस्तूंच्या किमतीत वाढ झालेली आहे. १९८२ ते २००१ या समयावधीत साबण, बोकडाचे मांस, तूप, साखर, गुळ, पीतळी पातेले, बटाटे, मिरची, उडीद, तूर, मूगडाळ, गहू, तांदूळ या वस्तूंच्या किमतीत साधारणतरू तिपटीने वाढ झाली.

**वाहतूक व दळणवळण :—**

३१ मार्च २००१ अखेर भंडारा व गोंदिया जिल्हा मिळून १३२ किमी लांबीचे दुहेरी रुंद लोहमार्ग अस्तित्वात आहेत. दोन्ही जिल्हे मिळून ३१ मार्च २००१ अखेर एकूण ७५ हजार २४८ मोटार वाहने वापरात होती त्यापैकी तीचाकी वाहने ५०७ व दुचाकी वाहने, ६० हजार ३९४ होती. तर अवजड वाहने १४ हजार ३४५ होती. गतवर्षाच्या तुलनेत २०००—०१ या वर्षात एकूण मोटार वाहनांच्या संख्येत १०. ८६% वाढ झाल्याचे दिसून येते.

जिल्ह्यात नगरपालिका महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषदेमार्फत रस्त्यांची निर्मिती करणे व निगा राखणे ही कामे करण्यात येतात. ३१ मार्च २००१ अखेर नगरपालिका हद्दीतील २९९ कि.मी., जिल्हा परिषदेचे ५ हजार ९३७ कि.मी. व शासकीय २ हजार १७५ किमी लांबीचे रस्ते आहेत. पृष्ठभागाच्या वर्गीकरणानुसार जिल्ह्यात डांबरीकरणाचे २८%, खडीचे व पक्के रस्ते ५०% व इतर प्रकारचे २२% रस्ते आहेत. मुंबई व कलकत्ता हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ रस्ता भंडारा व गोंदिया जिल्ह्यातून जातो.

जिल्ह्यात नोंदणी केलेल्या वाहनांची संख्या ३१ मार्च २००१ शेवटी एकूण ७५ हजार २४८ इतकी होती. त्यापैकी ६० हजार ३९४ दुचाकी ५०७ तीचाकी वाहने होती. १४ हजार ३४५ इतके अवजड वाहने होती. २०००—२००१ या वर्षी एकूण वाहनांच्या संख्येत १०.८६% वाढ झाली.

**दूरदर्शन संच :—**

शासनातर्फे ३१ मार्च २००१ चे शेवटी ५४६ दूरदर्शन संचाचे वितरण करण्यात आले, यात मागच्या वर्षीच्या तुलनेत वाढ झालेली नाही तसेच भंडारा व गोंदिया दोन्ही जिल्हे मिळून १९९९—२००० या वर्षात २७ हजार ६२९ दूरध्वनी संख्या होती. त्यात वाढ होऊन २०००—०१ मध्ये ही संख्या ३३ हजार ६१० वर पोहोचली आहे. मागच्या वर्षीच्या तुलनेत २२% वाढ झाली आहे.

**टपाल खाते :—**

३१ मार्च २००१ चे शेवटी भंडारा व गोंदिया जिल्हा मिळून ३०१ पोस्ट कार्यालये,२ तारघरे, १२९४ पत्रपेट्या व ३४१ पोस्टमन कार्यरत होते. ३०२ गावात नवीन कार्यालयाची सोय करण्यात आली असून, दरलाख लोकसंख्येमागे १३ पोष्ट कार्यालये कार्यरत आहेत.